पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

****

प्रेस नोट ०६/२१ दिनांक :– ०६/१२/२०२१

**मा. बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांचे आदेशान्वये दिनांक २५/११/२१ ते ०२/१२/२१ दरम्यान जिल्हयातील १३ पोलीस स्टेशन अंतर्गत नाकाबंदी व कोम्बींग ऑपरेशन चे आयोजन करण्यात आले.**

वाशिम जिल्हयात सध्या घरफोडी,चोरी, मोटार सायकल चोरी या सारख्या मालमत्तेच्या गुन्हयात वाढ होत असल्याने वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याकरीता मा. पोलीस अधिक्षक सो यांचे आदेशान्वये जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकाबंदी व कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले.त्यामध्ये दिनांक २५/११/२०२१ ते ०२/१२/२१ चे २३.०० ते ०५.०० दरम्यान १३ पोलीस स्टेशन अंतर्गत केलेल्या कारवाईचा तपशिल.

**नाकाबंदी कोंम्बीग ऑपरेशन दरम्यान करण्यात आ**

१) एकुण ३७ निगराणी बदमाश ४७ माहितगार गुन्हेगार,२६ सक्रिय गुन्हेगार चेक करण्यात आले.

२) ०८ अजामीनपात्र वॉरंट मधील आरोपी अटक व ०३ जामीन पात्र वॉरंट तामील करण्यात आले.

३) मुंबई दारुबंदी कायदयान्वये ३ इसमांवर कारवाई करुन एकुण ७० लिटर दारु ८२००/– चा माल जप्त करण्यात आला.

४)पोस्टे कारंजा शहर पोलीस ठाणे येथे मुपोका कलम १२२ प्रमाणे सुर्यास्त ते सुर्योदया दरम्यान संशईत पणे गुन्हा करण्याचे बेतात असलेल्या ३ गुन्हेगारांना अटक करुन कारवाई करण्यात आली.

५) पोस्टे रिसोड यांनी अपक्र ३०२/२१ कलम ३२४,३२३ भादवी सह कलम ४,२५ ऑर्म अॅक्ट मधील ४ आरोपीना अटक करुन २ तलवारी जप्त करण्यात आल्या,

६)त्याप्रमाणे ५ पारधी वस्त्या, ५० हॉटेल धाबे,लॉजेस चेक करुन गुन्हे गारांचा शोध घेण्यात आला.

मागील २ महिन्यात ३ कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले होते एकुण १३ नाकाबंदीची ठिकाणे नेमुन त्यात २५ अधिकारी ३३९ अंमलदार यांनी लहान वाहने ९९८ मोठी वाहने ११६१, चेक केली असुन विशेष कोम्बींग ऑपरेशन दरम्यान ४३ अधिकारी ६५ अंमलदार यांनी एकुण १३ ठिकाणी कोम्बींग ऑपरेशन करुन मोहिम राबवीली.

सदर नाकाबंदी कोम्बींग ऑपरेशन चे आयोजन मा.बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांचे मार्गदर्शनात . मा.गोरख भामरे अपर पोलीस अधिक्षक वाशिम यांच्या नियंत्रणात उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम,मंगरुळपीर,कारंजा तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी राबविले. वाशिम जिल्हयात वेळोवेळी नाकाबंदी कोम्बींगचे आयोजन करण्यावर भर दिला जाईल व गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसविण्याकरीता उपाययोजना करण्यात येतील असे मा. पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी सांगितले आहे.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम